RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - १४ ] गुरुवार ते बुधवार, एप्रिल ८ - १४, २०२१ / चैत्र १८ - २४, शके १९४३ [ पृष्ठे ०८

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले.--** (१) भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५.

(२) महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, दिनांक २० ते २६ जून २०१९.

**आदेश**

**जिल्हा धुळे**

क्रमांक भूसं/स्वीय/कावि/२९/१२७/२०२१.–अनेर मध्यम प्रकल्प, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे या प्रकल्पाअंतर्गत मौजे मांजरोद व भोरटेक, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे या गावांमध्ये अनेर मध्यम प्रकल्पांच्या उजव्या कालव्यावरील चारी क्रमांक १० ची उपवितरिका क्रमांक ५ व तिच्या उपचारी क्रमांक २ व ३ क्षेत्रासाठी जमीन संपादन करणेकामी प्रस्तावामध्ये भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची अधिसूचना दिनांक २० ते २६ जून २०१९ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचना प्रसिद्ध होऊन १ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही निवाडा घोषित होऊ न शकलेबाबत खालील कारणे नमूद केलेली आहेत.—

(१) सदर अधिसूचनेनुसार प्रसिद्ध होऊन १ वर्षाच्या आत अंतिम निवाडा घोषित करणे आवश्यक होते. दरम्यान विधानसभा सार्वत्रिक निवडणुका-२०१९, स्थानिक जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे महत्त्वाचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पार पाडणे अत्यावश्यक होते.

(२) तसेच ग्रामपंचायत, भोरटेक यांनी त्यांचे दिनांक २७ मे २०१९ रोजीच्या ग्रामसभेच्या ठरावा अन्वये उपचारी क्रमांक २ चे गट वगळण्यास हरकत घेऊन विनंती केली. सदरची उपचारी क्रमांक २ मध्ये संपादित होणारे एकूण २० गट वगळण्यास संपादन संस्था, मा. कार्यकारी अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग, धुळे यांचे पत्र जावक क्रमांक भूसं/७४७, दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ अन्वये अनुमती दिलेली आहे.

(३) तसेच विषयांकित प्रकरणी संपादित होणाऱ्या एकूण ७६ गटांपैकी ४३ गटांचे पोटहिस्से झाल्याने विषयांकित कामासाठी संपादित होणारे क्षेत्र नेमक्या कोणत्या पोटहिस्स्यातून जात आहे. याचा बोध होत नसल्याने भूसंपादन करण्याच्या प्रक्रियेस अडथळा आला. तसेच ग्रामपंचायत, भोरटेक यांच्या ग्रामसभेच्या ठरावामध्ये कळविलेनुसार जोपर्यंत पोटहिस्से वगळण्यात येत नाहीत. तोपर्यंत पुढील कार्यवाही न करण्यास घेतलेली हरकत इत्यादी बाबींमुळे निवाडा घोषित करण्यास विलंब होत आहे.

(४) देशात कोविड-१९ महामारीमुळे असलेले लॉकडाऊन व त्यामुळे कर्मचारी उपस्थितीवर असलेले निर्बंध/मर्यादा तसेच अत्यावश्यक सेवेमध्ये सर्वच विभागांना आरोग्य, कायदा व सुव्यवस्थेची निकडीची कामे असल्यामुळे सदर प्रस्तावाचा विहित मुदतीत अंतिम निवाडा घोषित होऊ शकला नाही.

तरी उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांनी दिलेली कारणे संयुक्तिक असल्याने, मी, दिलीप जगदाळे, जिल्हाधिकारी, धुळे भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ मधील परंतुकान्वये मला प्राप्त अधिकारानुसार अनेर सिंचन प्रकल्पांतर्गत कामी लागणाऱ्या जमीन संपादन करणेकामी खाली नमूद केलेल्या प्रस्तावामध्ये अंतिम निवाडा घोषित करणेच्या कार्यवाहीस माहे जून २०२१ अखेरपावेतो मुदतवाढ देत आहे.

खालील नमूद प्रस्तावमध्ये अंतिम निवाडा घोषित करण्याची कार्यवाही माहे जून २०२१ अखेर पूर्ण करून तसा अहवाल उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांनी सादर करावा.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | भूसंपादन प्रस्ताव क्रमांक | प्रस्तावाचे नाव | गावाचे नाव | तालुका व जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १/२०१९ | अनेर मध्यम प्रकल्प, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे या प्रकल्पांतर्गत मौजे मांजरोद व भोरटेक, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे या गावांमध्ये अनेर मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील चारी क्रमांक १० ची उपवितरिका क्रमांक ५ व तिच्या उपचारी क्रमांक २ व ३ क्षेत्रासाठी जमीन संपादन करणेकामी. | मांजरोद व भोरटेक. | तालुका शिरपूर, जिल्हा धुळे. |

**दिलीप जगदाळे,**
जिल्हाधिकारी, धुळे.

धुळे, १६ मार्च २०२१.

---

## प्रभारी जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले.--** (१) भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५.

(२) महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, दिनांक १९ डिसेंबर २०१९.

**आदेश**

**जिल्हा धुळे**

क्रमांक भूसं/स्वीय/कावि/२७/११८/२०२१.— सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेअंतर्गत मौजे सोंडले, तालुका धुळे, जिल्हा धुळे येथील जामफळ धरणपाया व बुडीत क्षेत्रासाठी जमीन संपादन करणेकामी प्रस्तावामध्ये भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची अधिसूचना दिनांक १९ डिसेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचना प्रसिद्ध होऊन १ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला आहे. मात्र, कोविड-१९ मुळे असणारा लॉकडाऊन व त्यामुळे कर्मचारी उपस्थितीवर असलेले निर्बंध तसेच उपविभागीय अधिकारी यांना आरोग्य, कायदा व सुव्यवस्थेची निकडीची कामे असल्यामुळे उपोद्घातातील नमूद प्रस्तावाचा अंतिम निवाडा विहित मुदतीत घोषित होऊ शकला नाही.

तरी उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांनी दिलेली कारणे संयुक्तिक असल्याने, मी, दिलीप जगदाळे, प्रभारी जिल्हाधिकारी, धुळे भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ मधील परंतुकान्वये मला प्राप्त अधिकारानुसार सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेअंतर्गत कामी लागणाऱ्या जमीन संपादन करणेकामी खाली नमूद केलेल्या प्रस्तावामध्ये अंतिम निवाडा घोषित करणेच्या कार्यवाहीस माहे जून २०२१ अखेर पावेतो मुदतवाढ देत आहे.

खालील नमूद प्रस्तावामध्ये अंतिम निवाडा घोषित करण्याची कार्यवाही माहे जून, २०२१ अखेर पूर्ण करून तसा अहवाल उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांनी सादर करावा.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | भूसंपादन प्रस्ताव क्रमांक | प्रस्तावाचे नाव | गावाचे नाव | तालुका व जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ७८/२०१८ | सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन अंतर्गत जामफळ धरणाच्या पायासाठी बुडीत क्षेत्रासाठीचा प्रस्ताव. | मौजे सोंडले | तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे. |

**दिलीप जगदाळे,**
प्र. जिल्हाधिकारी, धुळे.

धुळे, १० मार्च २०२१.

---

## अपर जिल्हादंडाधिकारी यांजकडून

**वाचले :** (१) पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील पत्र क्रमांक जिविशा/प्रतिबंधात्मक आदेश-४२७/२०२१, दिनांक ९ फेब्रुवारी २०२१.

(२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)*.

### आदेश

क्रमांक ड/कक्ष-३/एमएजी-२/कावि-३६०/२०२१.– उपोद्‌घातातील नमूद अनुक्रमांक (१) अन्वये पोलीस अधीक्षक, धुळे यांनी विनंती केली आहे की, धुळे जिल्ह्यातील आगामी काळात मराठा क्रांती मोर्चा, धनगर आरक्षण मोर्चा, मुस्लीम आरक्षण, ओ. बी. सी. संघटना अशा व इतर संघटना विविध प्रकारची आंदोलने करीत आहेत. तसेच दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ रोजी “छत्रपती शिवाजी महाराज जयंती” शासकीय तिथीप्रमाणे साजरी करणार आहे व दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी “संत रोहिदास महाराज जयंती” असून सध्या कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करण्यासाठी धुळे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव, दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजीचे ००.०१ वाजलेपासून दिनांक १ मार्च २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो मुंबई पोलीस कायदा, कलम ३७ *(१)* व *(३)* चे प्रतिबंधात्मक आदेश जारी होऊन प्रसिद्धी होणेस विनंती केलेली आहे.

तरी धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकामी पोलिसांना मदत व्हावी म्हणून पोलीस अधीक्षक, धुळे यांनी सादर केलेला अहवाल व वरील परिस्थिती पाहता माझी खात्री झालेने संपूर्ण धुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणेसाठी पोलिसांना मदत व्हावी म्हणून मी, संजय गायकवाड, अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे मला उपोद्‌घातात नमूद अनुक्रमांक (२) अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून धुळे जिल्ह्यातील कोणत्याही इसमास पुढील कृत्ये करण्यास याद्वारे मनाई करीत आहे.

(अ) सोटे, तलवारी, बंदुका, भाले, सुरे, लाठ्या किंवा शारीरिक दुखापती करण्यासाठी वापरात येतील अशी कोणतीही हत्यारे अथवा वस्तू बरोबर घेऊन फिरणे ;

(ब) अंग भाजून टाकणारा कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा द्रव्ये बरोबर घेऊन फिरणे ;

(क) दगड अगर अस्त्रे, सोडावयाची अगर फेकण्याची हत्यारे, साधने इत्यादी तयार करणे, जमा करणे आणि बरोबर नेणे ;

(ड) सार्वजनिक शांतता धोक्यात येईल अशी भाषणे करणे, हावभाव करणे अथवा सोंग आणणे ;

(इ) जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणणे, वाद्ये वाजविणे ;

(फ) कोणत्याही व्यक्तीची आकृती किंवा प्रतिमेचे प्रदर्शन करणे ;

(ग) सभा घेण्यास, मिरवणुका काढण्यास, पाच किंवा पाचापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई करीत आहे ;

(ह) संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या परवानगीशिवाय काढण्यात आलेले मोर्चे, रॅली, सभा ;

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* हा आदेश ज्यांना लाठी अगर तत्सम वस्तू घेतल्याशिवाय चालता येत नाही, अशा अपंग इसमांना लागू नाही. तसेच शासनाच्या सेवेतील ज्या व्यक्तींना आपल्या वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे, त्यांना लागू होणार नाहीत.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(३)* नुसार संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे व सदर कालावधीत सभा, मिरवणुका, मोर्चे, मीटिंग, कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या सहमतीने संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी द्यावी. अशी देण्यात आलेली परवानगी, तसेच लग्न मिरवणुका, धार्मिक मिरवणुका, आठवडे बाजार अगर प्रेतयात्रेच्या जमावास सदर निर्बंध लागू नाहीत.

सदरचा आदेश हा दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दिनांक १ मार्च २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो संपूर्ण धुळे जिल्ह्यात अंमलात राहील.

सदरचा आदेश हा दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**संजय गायकवाड,**
अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे.

धुळे, १५ फेब्रुवारी २०२१.

**वाचले :** (१) पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील पत्र क्रमांक जिविशा/प्रतिबंधात्मक आदेश-५३३/२०२१, दिनांक २० फेब्रुवारी २०२१.

(२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)*.

**आदेश**

क्रमांक ड/कक्ष-३/एमएजी-२/कावि-३९७/२०२१.– उपोद्‌घातातील नमूद अनुक्रमांक (१) अन्वये पोलीस अधीक्षक, धुळे यांनी विनंती केली आहे की, धुळे जिल्ह्यातील आगामी काळात मराठा क्रांती मोर्चा, धनगर आरक्षण मोर्चा, मुस्लीम आरक्षण, ओ. बी. सी. संघटना अशा व इतर संघटना विविध प्रकारची आंदोलने करीत आहेत. तसेच दिनांक ११ मार्च २०२१ रोजी "महाशिवरात्री" असून सध्या कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढत असून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करण्यासाठी धुळे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव, दिनांक ३ मार्च २०२१ रोजीचे ००.०१ वाजलेपासून दिनांक १७ मार्च २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो मुंबई पोलीस कायदा, कलम ३७ *(१)* व *(३)* चे प्रतिबंधात्मक आदेश जारी होऊन प्रसिद्धी होणेस विनंती केलेली आहे.

तरी धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकामी पोलिसांना मदत व्हावी म्हणून पोलीस अधीक्षक, धुळे यांनी सादर केलेला अहवाल व वरील परिस्थिती पाहता माझी खात्री झालेने संपूर्ण धुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणेसाठी पोलिसांना मदत व्हावी म्हणून मी, संजय गायकवाड, अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे मला उपोद्‌घातात नमूद अनुक्रमांक (२) अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून धुळे जिल्ह्यातील कोणत्याही इसमास पुढील कृत्ये करण्यास याद्वारे मनाई करीत आहे.

(अ) सोटे, तलवारी, बंदुका, भाले, सुरे, लाठ्या किंवा शारीरिक दुखापती करण्यासाठी वापरात येतील अशी कोणतीही हत्यारे अथवा वस्तू बरोबर घेऊन फिरणे ;

(ब) अंग भाजून टाकणारा कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा द्रव्ये बरोबर घेऊन फिरणे ;

(क) दगड अगर अस्त्रे, सोडावयाची अगर फेकण्याची हत्यारे, साधने इत्यादी तयार करणे, जमा करणे आणि बरोबर नेणे ;

(ड) सार्वजनिक शांतता धोक्यात येईल अशी भाषणे करणे, हावभाव करणे अथवा सोंग आणणे ;

(इ) जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणणे, वाद्ये वाजविणे ;

(फ) कोणत्याही व्यक्तीची आकृती किंवा प्रतिमेचे प्रदर्शन करणे ;

(ग) सभा घेण्यास, मिरवणुका काढण्यास, पाच किंवा पाचापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई करीत आहे ;

(ह) संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या परवानगीशिवाय काढण्यात आलेले मोर्चे, रॅली, सभा ;

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* हा आदेश ज्यांना लाठी अगर तत्सम वस्तू घेतल्याशिवाय चालता येत नाही, अशा अपंग इसमांना लागू नाही. तसेच शासनाच्या सेवेतील ज्या व्यक्तींना आपल्या वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे, त्यांना लागू होणार नाहीत.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(३)* नुसार संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे व सदर कालावधीत सभा, मिरवणुका, मोर्चे, मीटिंग, कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या सहमतीने संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी द्यावी. अशी देण्यात आलेली परवानगी, तसेच लग्न मिरवणुका, धार्मिक मिरवणुका, आठवडे बाजार अगर प्रेतयात्रेच्या जमावास सदर निर्बंध लागू नाहीत.

सदरचा आदेश हा दिनांक ३ मार्च २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दिनांक १७ मार्च २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो संपूर्ण धुळे जिल्ह्यात अंमलात राहील.

सदरचा आदेश हा दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**संजय गायकवाड,**
अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे.

धुळे, २६ फेब्रुवारी २०२१.

## मुख्याधिकारी यांजकडून

### सटाणा नगरपरिषद, सटाणा

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ सह कलम २३ *(१)* नुसार सटाणा नगरपरिषद क्षेत्राची (मूळ हद्द + वाढीव हद्द) सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

### सूचना

क्रमांक नगररचना/०३७६/२०२१.– महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ *(१)* अन्वये सटाणा नगरपरिषदेची वाढीव हद्द विकास योजना शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-११९८/१९९७/प्र.क्र. ३८० (ब)/९८/नवि-९, दिनांक १८ फेब्रुवारी २००० रोजी मंजूर केली आहे व ती दिनांक १ मे २००० पासून अंमलात आलेली आहे. अधिनियमाचे कलम ३८ अन्वये विकास योजना वीस वर्षांतून एकदा सुधारित करणे आवश्यक आहे. शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २५ जानेवारी २०१९ अन्वये अधिनियमाचे कलम १५४ अन्वये सदरची विकास योजना द्रुतगती पद्धतीने सुधारित करण्याची कार्यवाही करणेबाबत निदेश दिलेले आहेत. त्यानुसार विकास योजना सुधारित करण्यासाठी इरादा जाहीर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ *(१)* अन्वये सटाणा नगरपरिषदेची मूळ हद्दीची विकास योजना शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-११०३/२६४७/प्र.क्र. ५३ (ब)/०५/नवि-९, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ रोजी मंजूर केली आहे व ती दिनांक १५ डिसेंबर २००५ पासून अंमलात आलेली आहे.

शासनाच्या नगर विकास विभागाने अधिनियमाचे कलम १५४ अन्वये दिनांक १५ ऑक्टोबर २०१८ रोजी विकास योजना सुधारित करताना मूळ हद्द व वाढीव हद्द अशा दोन्ही भागांची विकास योजना एकत्रितरीत्या तयार करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. त्यानुसार सटाणा शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना सुधारित करताना मूळ हद्दीच्या विकास योजनेसह सुधारित करण्यासाठी इरादा जाहीर करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ सह कलम २३ *(१)* अन्वये सटाणा नगरपरिषदेच्या क्षेत्राची (मूळ हद्द+वाढीव हद्द) एकत्रित सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ६३९, दिनांक ४ मार्च २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ *(२)* अन्वये सटाणा नगरपरिषदेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगरपरिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकलासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत मुख्याधिकारी, सटाणा नगरपरिषद यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर कराव्यात. विकास योजना तयार करताना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**हेमलता पुंडलिक डगळे,**
मुख्याधिकारी,
सटाणा नगरपरिषद, सटाणा,
जिल्हा नाशिक.

सटाणा, २४ मार्च २०२१.

## SATANA MUNICIPAL COUNCIL, SATANA

*Declaration of intention to perpare Revised Development Plan of Satana Municipal Council area (Original Limit + Additional Area) as per Section 23 (1) read with Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.*

## NOTICE

No. Town Planning/0376/2021.– Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1198/1997/C.R. 380 (B)/98/UD-9, dated 18th February 2000 has sanctioned the Development Plan of Additional Area of Satana Municipal Council under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and the same has came into force from 1st May 2000. It is necessary to revise the sanctioned Development Plan once in twenty years as per Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Government in Urban Development Department *vide* Order, dated 25th January 2019 has given directives under Section 154 of the said Act, to revise the said Development Plan in a fastract manner. Accordingly it is necessary to declare intention to revise the Development Plan.

Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1103/2347/C.R. 53 (B)/05/UD-9, dated 31st October 2005 has sanctioned the Development Plan of Original Limit of Satana Municipal Council under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and the same has came into force from 15th December 2005

Government in Urban Development Department *vide* Order dated 15th October 2018 under Section 154 of the said Act, has given directives to prepare Development Plan jointly of Original Limit along with Additional Area while revision of the Development Plan. Accordingly at the time of revision of Development Plan of Additional Area, it is necessary to declare intention including the area of Original Limit.

Hence, the Satana Municipal Council by its Resolution No. 639, dated 4th March 2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan of it's area (Original Limit + Additional area) as per provision of Section 38 and Section 23 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 Accordingly, this Notice is being published.

The plan showing boundaries of the area included in Development Plan of Satana Municipal Council is kept open for inspection by the Public on office working days, during office hours at the office of the Satana Municipal Council as required under Section 23 *(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestions / objections of the public in this regards may be forwarded in writing to the Chief Officer, Satana Municipal Council within a period of 60 (sixty) days from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette. The suggestions / objections shall be duly considered while preparing the Development Plan.

**HEMLATA PUNDLIK DAGLE,**
Chief Officer,
Satana Municipal Council, Satana,
district Nashik.

Satana, 24th March 2021.

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### नोंदणी रद्द आदेश

क्रमांक सनिश्री/वि-३/घृष्णेश्वरग्राबिशेपत/विलिनीकरण/श्रीरामग्राबिशेपत/१४६७/सन २०२०.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ व १०९ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, रावसाहेब खेडकर, सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर असा आदेश देतो करतो की, **ग्रामविकास ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,** निवंबी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर तथा घृणेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, देऊळगाव, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर (नोंदणी क्रमांक एएनआर/एसजीए/आरएसआर/सीआर/१२१०/सन १९९४, दिनांक २१ मार्च १९९४) या संस्थेचे राजमाता जिजाऊ महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, पानोली, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर जिचा नोंदणी क्रमांक एएनआर/एसजीए/आरएसआर/सीआर/१२९०/सन १९९४, दिनांक ७ मार्च १९९४ या नोंदणीकृत पतसंस्थेमध्ये विलीनीकरण झाले असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ व कलम १०९ (१) अन्वये ग्रामविकास ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, निबंवी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर तथा घृणेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, देऊळगाव, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर या संस्थेची नोंदणी रद्द करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १९ जून २०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित करीत आहे.

श्रीगोंदा, १९ जून २०२०.

---

### जाहिरनामा

क्रमांक सनिश्री/वि-२/लक्ष्मीअंगणबिसीगृनिसं/संस्था नोंदणी/जाहिरनामा/१७६७/सन २०२०.- सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर हे जाहीर करतात की, **लक्ष्मीअंगण बिल्डींग सी गृहनिर्माण सहकारी मर्यादित,** श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा अधिनियम, १९६१ चे नियम २४ अन्वये नोंदविण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ चे नियम १० *(१)* अन्वये संस्थेचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था** असे करण्यात येत आहे.

सदर संस्थेचा नोंदणी क्रमांक एएनआर/एसजीए/एचएसजी/टीओ/४७७९/सन २०२०, दिनांक २२ जुलै २०२० असा आहे.

**रावसाहेब खेडकर,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर.

श्रीगोंदा, २२ जुलै २०२०.

---

### आदेश

क्रमांक डीएलई/एसपीआर/जीएनएल/(ओ)/७७/९३७/२०२०-२१/सन २०२०.- मी, अशोक बागल, सहायक निबंधक, सहकारी संस्था, शिरपूर, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे जाहीर करतो की, **नियोजित जय महाकाल नाविण्यपूर्ण बहुविविध सेवा सहकारी संस्था मर्यादित,** शिरपूर, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* अन्वये नोंदणी करण्यात आलेली असून तिचा नोंदणी क्रमांक डीएलई/एसपीआर/जीएनएल/(ओ)/७४७/२०२०-२१/सन २०२०, दिनांक १३ जुलै २०२० असा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ *(१)* व त्याखालील नियम १० *(१)* अन्वये संस्थेचे वर्गीकरण **सर्वसाधारण संस्था** असून उपवर्गीकरण **इतर संस्था** असे आहे.

**अशोक बागल,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, शिरपूर,
जिल्हा धुळे.

धुळे, १३ जुलै २०२०.

---

## उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक आस्था/डीएलई (डीएलई)/पीआरडी/आय/११०९/२०१९-२०/५०९/सन २०२०.- उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे जाहीर करतात की, **मातोश्री निरा व ताडी उत्पादक सहकारी संस्था मर्यादित,** धुळे, तालुका-जिल्हा धुळे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे (सन १९६१ चा नियम क्रमांक २४) कलम ९ *(१)* अन्वये नोंदविण्यात आलेली असून तिचा नोंदणी क्रमांक डीएलई/(डीएलई)/पीआरडी/आय/११०९/२०१९-२०२०/सन २०२०, दिनांक २६ फेब्रुवारी २०२० असा आहे.

संस्थेचे वर्गीकरण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ *(१)* व त्याखालील नियम १० *(१)* अन्वये **उत्पादक संस्था** व उपवर्गीकरण **औद्योगिक उत्पादक संस्था** असे आहे.

धुळे, २६ फेब्रुवारी २०२०.

---

**आदेश**

क्रमांक आस्था/डीएलई (डीएलई)/एचएसजी/टीसी/१०००/२०२०-२१/१०००/सन २०२०.- उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे जाहीर करतात की, **पियुष लाईफस्पेसेस निर्मित चंद्रवेल-३ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,** धुळे, तालुका-जिल्हा धुळे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे (सन १९६१ चा नियम क्रमांक २४) कलम ९ *(१)* अन्वये नोंदविण्यात आलेली असून तिचा नोंदणी क्रमांक डीएलई/(डीएलई)/एचएसजी/१०२३/२०२०-२१/सन २०२०, दिनांक २ जून २०२० असा आहे.

संस्थेचे वर्गीकरण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १२ *(१)* व त्याखालील नियम १० *(१)* अन्वये **गृहनिर्माण संस्था** व उपवर्गीकरण **भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्था** या उपवर्गात करण्यात येत आहे.

धुळे, २ जून २०२०.

---

**आदेश**

क्रमांक वि-८/अक्षय न्याया. कर्म.गृह./कलम १०२ (१)/अंतिम आदेश/८३८/सन २०२०.- मी, विलास गावडे, उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, तालुका धुळे मला शासन आदेश क्रमांक सीएसएल-१४९३/११६२/सीआर-४७/१५-स, दिनांक ७ ऑगस्ट १९९३ अनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ (१) (क) मधील तरतुदीनुसार **अक्षय न्यायालयीन कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,** धुळे या संस्थेच्या सर्व व्यवहार / कारभार गुंडाळण्याबाबतचा अंतिम आदेश पारित करीत असून सदर संस्थेचा व्यवहार / कारभार गुंडाळण्यात येत आहे आणि कलम १०३ (१) मधील तरतुदीनुसार श्री. अमोल यंडाईत, मुख्य लिपिक अधीन उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका यांची संस्थेचे अवसायक म्हणून नेमणूक करीत आहे.

तसेच असाही आदेश देतो की, सदर संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनी संस्थेची सर्व मालमत्ता वस्तू, दाव्यायोग्य हक्क आणि सर्व दस्तऐवज/अभिलेखे यांचा ताबा उक्त नमूद अवसायक यांचेकडे सुपूर्द करावा.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी व कार्यालयीन मुद्रेसह आज दिनांक २६ मे २०२० रोजी दिल आहे.

**विलास गावडे,**
उपनिबंधक,
सहकारी संस्था, धुळे तालुका

धुळे, २६ मे २०२०.

---

## सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांजकडून

**आदेश**

क्रमांक जिदुविअ/जळगाव/सहकार/उत्राण दूध संस्था/पुनर्जीवन आदेश/२९८/सन २०२०.- मी, रविंद्र पाटील, सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), जळगाव मला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम १९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **उत्राण सहकारी दूध उत्पादक सोसायटी लिमिटेड,** उत्राण, तालुका एरंडोल, जिल्हा जळगाव या संस्थेचे या आदेशाच्या तारखेपासून पुनर्रचना झालेचे घोषित करीत आहे. तसेच संस्थेचा नोंदणी क्रमांकात बदल न होतो पूर्वीचाच नोंदणी क्रमांक कायम राहील.

सदरचा आदेश मी आज दिनांक ११ मार्च २०२० रोजी माझ्या सहीशिक्क्यानिशी कार्यालयीन मोहोर ठसवून निर्गमित केला असे.

जळगाव, ११ मार्च २०२०.

---

**आदेश**

क्रमांक जिदुविअ/जळगाव/सहकार/४६२/सन २०२०.-मी, रविंद्र पाटील, सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), जळगाव अधिसूचित करतो की, **भटाई माता दूध उत्पादक सहकारी संस्था मर्यादित,** भटगाव, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* (महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम क्रमांक २४) अन्वये नोंदणी करण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १० *(१)* अन्वये संस्थेचे वर्गीकरण **कृषी संस्था** असून उपवर्गीकरण **अन्य कृषी संस्था** असा आहे.

सदर संस्थेचा नोंदणी क्रमांक जेजीए/बीडीएन/एजीआर/(ओ)/(डी)/२८०/२०२०, दिनांक १९ जून २०२० असा आहे.

**रविंद्र र. पाटील,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), जळगाव.

जळगाव, १९ जून २०२०.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.